## : प्रकरण दुसरे :

## बाबुराव ठाकूर : शैक्षणिक कार्य

ठोबळ मानाने भारतीयांच्या स्वातंत्र्य लढयाचे मुख्य व मुलभूत उदिष्ट ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्तता हे होते. हे जरी खरे असले, तरी स्वातंत्र्य लढयाचे स्वरूप आणि मर्यादा फक्त राजकीय स्वातंत्र्याच्या संकल्पनेपर्यंतच सिमित नव्हती. भारतीयांचा स्वातंत्र्य संग्राम ज्या प्रमाणात राजकीय पातळीवर लढला गेला, त्याच प्रमाणात सामाजिक पातळीवर सुध्दा लढला गेला. कारण सामाजिक न्याय व समतेविना राजकीय स्वातंत्र्य ख-या अर्थाने निर्थक व कुचकामी आहे याची जाणीव सुशिक्षित, सुसंस्कृत हिन्दु युवा पिढीला होऊ लागली होती. स्वातंत्र्य युध्द हे परकीयांच्या विरूध्द होते. त्यामुळे ब-याच अंशी के सुकर होते. पण सामाजिक न्याय व समतेचे युध्द स्वकियातील पुराणमतवादी, कर्मकांड, जातील प्रवृती विरूध्द होते, त्यामुळे ब-याच अंशी जटील होते.

हिन्दुच्या सामाजिक मागासलेपणाचे मुळ शैक्षणिक, आर्थिक, मागासलेपणात होते. त्यामुळे सामाजिक व शैक्षणिक सुधारणा भारतीय स्वातंत्र्य संग्रमाच्या अविभाज्य घटक बनल्या होत्या. महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढयाची व्याप्ती वाढली ती या अनुषंगाने. स्वातंत्र्याच्या मागणी बरोबरच सामाजिक व शैक्षणिक सुधारणांचा कार्यक्रम मोठया प्रमाणात अंगीकृत करण्यात आला. बेळगाव ( कर्नाटक राज्य ) याला अपवाद नव्हते. या भागातील सामाजिक व शिक्षण प्रसाराच्या बहुमूल्य कार्यात, बाबुरावानी बहुमूल्य योगदान दिले. प्रथमत: बाबुरावांच्या शैक्षणिक कार्याची माहिती घेऊ.

..

धोंडो राजाराम ठाकूरांनी स्वत:ला स्वातंत्र्याच्या लढयात विद्यार्थी दशेतच झोकुन दिल्यामुळे, त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण अपूर्ण राहिले होते. पण शिक्षणाचे महत्व त्यानी दुर्लक्षिले नाही.

धोंडो राजाराम उर्फ बाबुराव ठाकूर म्हणतात, ... खेड्यातील शेतकरी व कामगाराना शिक्षणाशिवाय पर्याय नाही, त्यांची प्रगती होणार नाही, ग्रामीण जनतेला अज्ञान व अंध:कारातून बाहेर पडावयाचे असेल, त्याना स्वातंत्र्याची खरी किंमत कळावयाची असेल, त्याना राष्ट्रीय प्रवाहात सहभागी करून घ्यावयाचे असेल व पर्यायाने स्वातंत्र्याचा लढा तीव्र करावयाचा असेल तर शिक्षण प्रसार अनिवार्य आहे... [१]. म्हणून त्यानी केळगाव परिसरातच शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. कारण सामाजिक मागासलेपणाचे मुळ शैक्षणिक मागासलेपणात आहे हे बाबुरावानी बरोबर हेरले होते. त्यांच्या सामाजिक कार्याची दिशा स्पष्ट होती. शैक्षणिक प्रसाराविना सामाजिक सुधारणा करणे योग्य होणार नव्हते.

बाबुरावांचा शिक्षण विषयक दृष्टीकोण सुस्पष्ट दिसतो. शिक्षणाशिवाय समाज व पर्यायाने देश प्रगती करूच शकणार नाही. शिक्षणा अभावी केळगाव परिसरातील समाज अज्ञान व अंध:कारात खितपत पडला आहे, आधुनिक युगाची चाहूल त्यास लागत नाही, कामगार वर्गाचे शोषण होते, समाज चारित्र्यवान बनवावयाचा असेल, सुसंस्कार संपन्न पिढी घडवावयाची असेल, समाजात स्वातंत्र्याची भावना जागृत करावयाची असेल, मिळालेले स्वातंत्र्य टिकवावयाचे असेल, समाजास देशी-विदेशी हालचालीत सहभागी करून घ्यावयाचे असेल तर शिक्षण आवश्यक आहे [२]. तसेच राजकीय चळवळीमुळे आपणास शिक्षण घेता आले नाही, पण आपल्या प्रमाणेच शाळेच्या अभावी समाज शिक्षणापासून वंचीत राहता कामा नये अशी आंतरीक तळमळ बाबुरावांच्या मनात

..

होती म्हणून त्यानी सर्वप्रथम शिक्षण प्रसारासाठी शिक्षण प्रचाराचा कार्यक्रम बेळगाव शहरात प्रथम हाती घेतला [३].

बाबुरावांच्या शिक्षण प्रसार कार्याचे ठळक मानाने दोन कालखंड पाडता येतील. प्रथम कालखंड १९१८-१९२५ व व्दितीय कालखंड १९३७-१९५५ होय. सन १९२५-३७ या काळात बाबुरावांचा सक्रीय राजकारणातील व्याप वाढल्यामुळे शिक्षण प्रसाराकडे हवे तेवढे लक्ष पुरविता आले नाही.

<u>बाबुराव ठाकूर: शिक्षण प्रसार - प्रथम कालखंड १९१८-१९२५:</u>

शिक्षण प्रसाराचा श्रीगणेशा बाबुरावानी विद्यार्थी दशेतच केला आहे. या कार्यामागे फक्त उच्च प्रेरणा नव्हती, तर नियोजनबध्दता पण होती. कार्यारंभाच्या आधी त्यानी पूर्ण विचार केला होता. हे कार्य कसे व कोणत्या दिशेने करावे याबाबत बाबुरावांची निश्चित मतप्रणाली तयार झाली होती.

आर्थिक अडवणीमुळे या कार्याला मर्यादा पडतात. कारण बहुतेक वेळ उदरनिर्वाहासाठीच खर्च करावा लागतो. पण ज्यांच्याकडे आर्थिक बळ आहे, ते याबाबतीत उदासिन आहेत. ज्याना सामाजिक सुधारणेत रस आहे, त्याना आर्थिक पाठबळ नाही, म्हणून सामा क कार्यास आर्थिक साहाय्य उपलब्ध करणे आवश्यक आहे, याची जाण बाबुरावाना होती [४].

पण याहून महत्वाचे म्हणजे बाबुरावांनी विविध भागत सुरू असलेल्या समाज सुधारणा कार्यातील मूलभूत त्रुटी अचूक हेरल्या होत्या. समाज सुधारणेचे फायदे ज्या वर्गात प्रथम समाज सुधारणा झाली आहे, त्यांच्या पुरतेच मर्यादित रहात. खऱ्या अर्थाने समाज सुधारणा करावयाची म्हणजे त्याची व्याप्ती वाढवून अज्ञान, अंध:कारात, गरिबीत गुरफटलेल्या बहुसंख्य जनतेपर्यंत सुधारणा पोहचणे आवश्यक होते. हे कार्य किती अवघड व व्यापक आहे, याची बाबुरावाना कल्पना होती. बाबुराव पूर्णपणे

जाणून होते, की समाज सुधारणा कार्याने प्रेरीत झालेल्या एकट्या, दुकट्या व्यक्तिपेक्षा या कार्यास पूर्णपणे वाहून घेतलेली एखादी संस्थाच या कार्यास यथा योग्य न्याय देऊ शकेल. कारण थोड्या वेळेत, कमी पैक्षात, संस्थेमुळे ही मोठी कामे सहज पार पाडता येतात [५], असा त्यांचा विश्वास होता, म्हणून एखादी संस्था स्थापन करावी असे त्याना वाटत होते. याच वैचारिक पार्श्वभूमीवर त्यानी दिनांक २५-१०-१९१८ रोजी बेळगाव येथे " भारत वैभव समाज " या नावाची संस्था स्थापन केली [६].

या संस्थेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे होती:-

१) कामगार वर्गासाठी रात्रशाळा स्थापन करून त्या ना मोफत शिक्षण देणे.

२) समाजात शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे.

३) समाजात लोक जागृती निर्माण करणे व त्यासाठी (अ) मोफत वाचनालय (२) पुस्तकालय (क) डिबेटींग सोसायटीची स्थापना करणे.

( नोट: एकी, नि:स्वार्थीपणा व बंधू ही तीन तत्वे होत )

बाबुरावानी वरील शैक्षणिक उद्देश व तत्वे समोर ठेवून " भारत वैभव समाजाची " स्थापना केली होती [७].

## भारत वैभव समाज स्वयंसेवक मंडळ:

भारत वैभव समाजाचे कार्य व्यवस्थितरित्या चालावे, समाजाचे उद्देश कृतीत आणण्यात गतीशीलता यावी यासाठी बाबुरावानी खालील प्रमाणे संचालक मंडळ नियुक्त केले होते [८].

..

संचालक मंडळ

| अ.नं. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | श्री. जी.एस.कुलकर्णी | जनरल सेक्रटरी |
| २) | श्री. एस.एस.जायदे | मोफत शाळेचे सेक्रेटरी |
| ३) | श्री. एस.एस.बिडीकर | पुस्तकालय व वाचनालय सेक्रेटरी |
| ४) | श्री. पी.बी.सबनीस | डिबेटींग सोसायटी सेक्रेटरी |
| ५) | श्री. एम.एच.पेडणेकर | ) मासिक, तरूण भारत |
| ६) | श्री. डी.आर.ठाकूर | ) वृतपत्र सेक्रेटरी |

बाबुराव व त्यांच्या मित्र समुहाने बेळगाव शहरात घरोघरी जावून मजूरांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. परिणामत: रात्रीच्या मोफत शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढू लागली, त्यामुळे त्यांच्या शाळेची संख्या ३ वरून ७ पर्यंत गेल्याचे आपणास दिसते [९].

' भारत वैभव समाज ' संस्थेमार्फत बाबुरावानी विविध कार्य हाती घेतले. बेळगाव शहरात कामगार वर्गाची संख्या मोठी होती, पण बहुतांशी कामगार अशिक्षित, अडाणी होते. त्यांच्याकरिता ' भारत वैभव समाजाने ' बेळगावात अनेक भागात कामगारासाठी शाळा सुरू केल्या. त्यांची संख्या वाढताच बाबुरावांनी शाळांची संख्याही वाढविली. खालील तक्त्यावरून विविध शाळा, त्यातून शिकत असलेल्या मजूरांची संख्या व संबंधित शिक्षक वर्गाची माहिती मिळते [१०].

१) मजुरांसाठीच्या शाळा:

| अ.नं. | शाळेचे ठिकाण | शिकत असलेल्या मजुरांची संख्या | शिक्षकाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | बेळगाव बापट गल्ली | ३५ | १) श्री. एन.के.कुलकर्णी<br>२) श्री. व्ही.के.कुलकर्णी<br>३) श्री. बी.पाटील. |
| २) | बेळगाव तासीलदार गल्ली | ४४ | १) श्री.एम.ए.सावंत<br>२) श्री.आर.ए.शेलार<br>३) श्री.डी.ए.सावंत<br>४) श्री.एस.एन.चौगुला |
| ३) | बेळगाव कांग्राळकर गल्ली | ५९ | १) श्री.जी.ए.खानोलकर<br>२) श्री.के.पी.पाटील<br>३) श्री.ए.जी.कामतनूर |
| ४) | बेळगाव कोंडोलकर गल्ली | १५ | १) श्री.हन्नरगीकर |
| ५) | बेळगाव पाटील गल्ली | २२ | १) श्री.कमरीकर |
| ६) | बेळगाव चांभार गल्ली | १२ | १) श्री.कुलकर्णी |
| ७) | बेळगाव महारवाडा | २५ | १) श्री.शिंदगी |

२) मोफत वाचनालय,पुस्तकालय व डिबेटींग सोसायटी:

' भारत वैभव समाज ' या संस्थेमार्फत जनतेत जागृती करण्यासाठी व शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी समादेवी गल्ली,

..

घर नंबर ३४४७ बेळगाव येथे मोफत वाचनालय व पुस्तकालय आणि डिबेटींग सोसायटी सन १९१९ पासून सुरु केली होती [११].

मोफत वाचनालयात एकूण मासिक व वर्तमानपत्रे ७० ते ८० येत होती, तर पुस्तकालयात इंग्रजी व मराठी पुस्तकांची संख्या ६०० पेक्षा जास्त होती. हे वाचनालय संध्याकाळी ७-०० ते ९-०० पर्यंत सर्वांसाठी खुले असे. वाचनालयाचा लाभ ५० ते ६० लोक नियमीतपणे घेत असत. तर डिबेटींग सोसायटी मार्फत " तरुणांचे आजचे कर्तव्य ", " आजची शिक्षण प्रणाली योग्य की अयोग्य " या विषयावर स्पर्धा ठेवल्या होत्या [१२]. प्रत्येक विषयात दहा तरुणांनी भाग घेतला होता.

शिक्षण प्रसार कार्यातील अडचणी:

बाबुराव ठाकूर यांनी भारत वैभव समाजामार्फत सुरु केलेल्या रात्रीच्या मजूर शाळेस अनेक समस्याना सामोरे जावे लागले, पण त्यांनी त्या सर्व समस्येवर मात करुन आपले कार्य नेटाने चालविले.

बाबुराव ठाकूर यांनी ज्यांना वेळेच्या अभावी व गरिबीमुळे शिक्षण घेता येत नव्हते त्या मजूर वर्गाला भेटून मोफत शिक्षणाची सोय केली. एवढेच नव्हे तर त्यांच्या सवडीनुसार रात्र शाळेची वेळ सायंकाळी ७ ते रात्री ९ अशी ठेवल्यामुळे शाळेत विद्यार्थी संख्या वाढू लागली. तेंव्हा बाबुराव ठाकूर यानी सुशिक्षितानी गरीब देश बांधवांची सेवा करण्यासाठी ( अध्यपनाचे काम करण्यासाठी ) पुढे यावे [१३] असे आवाहन करताच, मुंबई हायकोर्टाचे वकील श्री.एच.व्ही.शिरगांवकर, बेळगाव को-ऑपरेटिव्ह संस्थेचे सचिव श्री.एम.एस.सावंत यानी मोफत अध्यापनाचे काम करण्याचे मान्य केले [१४]. तेंव्हा समाजातर्फे त्यांचा देशसेवा करणारे महान नेते म्हणून गौरव करण्यात आला. त्यामुळे मोफत अध्यापनासाठी अनेक सुशिक्षित तरुण पुढे आले आणि शिक्षकांचा प्रश्न मिटला.

..

बाबुराव ठाकूर यानी व त्यांच्या कांही तरूण मित्रानी भारत वैभव समाज संस्थेमार्फत सुरू केलेल्या कार्यास आर्थिक अडचण भासत होती. पण ती अडचण समाजाची सभासद वर्गणी व देणगी जमा करून सोडविली.

भारत वैभव समाजाची सभासद वर्गणी:

१) समाजाचे आश्रयदाते : संस्थेस एकदम रू.१०० अथवा त्याहून जास्त देणगी देणारे.

२) समाजाचे कायम सभासद: संस्थेस रू.५० पासून रू.१०० पर्यंत देणगी देणारे.

३) समाजाचे सभासद: संस्थेस प्रतिवर्षास केवळ रू.३ वर्गणी देणारे संस्थेचे सभासद असतील.

अशाप्रकारे भारत वैभव समाजाची सभासद वर्गणी निश्चित करून [१५] समाजाचे आर्थिक अडचण दूर करण्याचा प्रयत्न केला होता.

भारत वैभव समाजाचे लोकशिक्षण, समाज जागृती व लोक सेवेचे कार्य पैशाअभावी थांबू नये म्हणून संस्थेस सढळ हाताने देणगी देऊन राष्ट्रीय कार्य करावे असे आवाहन बाबुराव ठाकूर यानी सतत केल्यामुळे अनेकांनी सढळ हातानी संस्थेस देणगी दिली [१६]. म्हणून संस्थेचे हे कार्य पार पडले. संस्थेस देणगी देणाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे.

..

| अ.नं. | देणगीदाराचे नाव | | देणगीची रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १) | श्री. गंगाधरराव देशपांडे | .. | १०० |
| २) | श्री. वामनराव देसाई | .. | १०० |
| ३) | श्री. केशवराव भोसले ( ललित कलादर्शक नाटक मंडळीचे मालक ) | | ५० |
| ४) | श्रीमंत चावडीकर इनामदार | .. | ५० |
| ५) | श्री. रा.ब.नाईक | .. | २५ |
| ६) | श्री. लिंगय्या नायडू | .. | २५ |
| ७) | श्री. डी.जी.चंदावरकर | .. | १० |
| ८) | डॉ. व्ही.जी.हेरेकर | .. | १० |
| ९) | श्री. शिरगांवकर | .. | ५ |
| १०) | श्री. एन.आर.तवळे | .. | ५ |

अशा अनेक व्यक्तिंच्या उदार हस्ते मिळालेल्या देणग्यामुळे व संस्थेची सभासद वर्गणी यामुळे समाजापुढील आर्थिक अडचण दूर झाली. अध्यापनाच्या कामासाठी अनेक सुशिक्षित विना वेतन काम करण्यासाठी पुढे आल्यामुळे शिक्षण प्रसार कार्य थांबले नाही, हे चालूच राहिले.

बाबुराव ठाकूर यानी आपल्या मित्राच्या सहकार्याने विद्यार्थी दशेत " भारत वैभव समाज " नावाची संस्था स्थापन करून स्वातंत्र्यपूर्व काळात समाज जागृती, लोकशिक्षण व लोकसेवा करण्याचे बहुमोल कार्य हाती घेतले होते. भारत वैभव समाज संस्थेस महात्मा गांधीचे पट्टशिष्य पंडित तारानाथ रॉय [१७]. अमरावातीचे प्रसिध्द पुढारी श्री.वामनराव

..

जोशी, अकोल्याचे श्री.वासुदेवराव चिपळूणकर, नटवर्य श्री.केशवराव भोसले [१८]
आदी त्या काळातील मान्यवर सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी संस्थेस
भेट देऊन रात्रशाळा, वाचनालय, पुस्तकालय, तरुण भारत प्रकाशन इ.
कार्याबद्दल भारत वैभव समाजाचे व बाबुराव ठाकूर यांचे कौतुक केले होते.

बाबुराव ठाकूर यांनी स्वतंत्र्य पूर्व काळात विद्यार्थी दशेत भारत वैभव समाजाच्या व्यासपीठावरून लोकशिक्षण, समाजसुधारणा, अज्ञानी कामगार वर्गात शिक्षणाचा प्रसार करून त्याना शिक्षण देणे हे केलेले कार्य बेळगाव परिसरातील जनतेला निश्चितच अभिमानास्पद आहे.

भारत वैभव समाजाचे कार्यकर्ते विशेषत: बाबुरावानी स्वत:ला स्वातंत्र्याच्या चळवळीत पूर्णत: झोकून दिल्यामुळे शिक्षण प्रसार कार्याकडे लक्ष देता आले नाही. परिणामत: १९२६ पासून शिक्षण प्रसार कार्याकडे दुर्लक्ष झाले.

बाबुराव ठाकूर : शिक्षण प्रसार - व्दितीय कालखंड (१९३७-५५ ):

बाबुराव ठाकूर यांच्या व्दितीय कालखंडातील शिक्षण प्रसार कार्यास बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या स्थापनेनंतर व्यापक स्वरूप आले. बाबुराव ठाकूरांच्या शिक्षण प्रसाराच्या या खंडाच्या प्रगतिचा आढावा घेण्यापूर्वी या कार्यास पूरक ठरलेल्या घटनांचा व व्यक्तिंचा प्रथम संदर्भ घेणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय शिक्षणावर विचार विनिमय करण्यासाठी महात्मा गांधीच्या अध्यक्षतेखाली वर्धा येथील नवभारत विद्यालयात, दिनांक २१ व २२ आक्टोबर,१९३७ मध्ये एक महत्वाची शैक्षणिक परिषद भरली होती [१९]. या परिषदेत भारतात अस्तित्वात असलेल्या शिक्षण

..

पध्दतीचा टीकात्मक आढावा घेण्यात आला होता. तसेच मेकॉले प्रणीत ब्रिटीश शिक्षण पध्दतीचा त्याग करून भारतीयांनी राष्ट्रीय शिक्षण घ्यावे असे विचार मांडण्यात आले. भारतीय वृतपत्रातून वर्धा शैक्षणिक परिषदेस अधिक प्रसिध्दी देण्यात आली होती. तिथे मांडण्यात आलेल्या विचारामुळे बाबुराव प्रभावीत झाले होते.

तसेच आण्णासाहेब लठ्ठे ( १८७८-१९५० ) यानी सुध्दा बाबुरावांना शिक्षण प्रसार कार्यासंबंधी प्रोत्साहन दिले होते. ते बाळासाहेब खेर मंत्रिमंडळात ( मुंबई राज्य, १९३७ ) अर्थमंत्री असताना बाबुरावांनी पुणे येथे त्यांची भेट घेतली होती. त्याप्रसंगी आण्णासाहेब लठ्ठेनी, बाबुरावाना सरकारने सुरू केलेल्या लोक कल्याण योजनांची माहिती दिली. त्यातील एक योजना, 'अनुदानासह शाळा काढण्यासाठीची होती'. ज्याचा फायदा गुजराथमध्ये मोठया प्रमाणात घेतला जात असे. तेंव्हा आपणही शाळा काढून, शिक्षण प्रसार कार्य हाती घेऊन राष्ट्रीय कार्य करावे, असा सल्ला आण्णासाहेब लठ्ठेनी बाबुरावाना दिला होता [२०].

शिक्षण प्रसारातील मुख्य अडचण आर्थिक होती, अनुदानाच्या तरतुदीमुळे हा प्रश्न बहुतांशी मिटणार होता. शिक्षणाची दिशा उपलब्ध झाली होती. मुळातच बाबुरावांना राष्ट्रीय शिक्षण व शिक्षण प्रसाराविषयी तळमळ होती. या नवीन पार्श्वभूमीवर त्यानी शिक्षण प्रसारास स्वत:ला वाहून घेतले.

आण्णासाहेब लठ्ठे व्यतिरिक्त डॉ. गो.वा.हेरेकेर( मृत्यू १९४९ ) चतुरदास शहा ( १८९८-१९७७ ) या शिक्षणप्रेमींचे बहुमोल सहाय्य त्याना लाभले [२१] म्हणून बाबुरावाना शिक्षण प्रसार कार्यास गती देता आली.

..

## बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची स्थापना:

दुसऱ्या कालखंडातील शिक्षण प्रसाराची प्रथम नांदी म्हणजे दिनांक २५-१०-१९३७ रोजी बेळगाव येथे चंदगड, खानापूर व बेळगाव तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची व शिक्षणप्रेमींची बोलावलेली सभा होय [२२]. या सभेस अंदाजे ५० ते ६० कार्यकर्ते हजर होते. या सभेत शिक्षण प्रसार करण्याचा प्रमुख कार्यक्रम ठरला. तदनुसार मुख्यत: शिक्षण प्रसाराचे व प्रौढ शिक्षण प्रसाराचे कार्यक्षेत्र बेळगाव जिल्हयापुरते मर्यादित ठेवावे व तिथे शिक्षण व साक्षरता प्रसारासाठी प्रौढ शाळा सुरू करण्याचे ठरले. त्यासाठी बाबुरावानी २५-१०-१९३७ रोजी बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीची सेवा, कला ज्ञान व उद्योग ( तमसो मा ज्योतिर्गमय - अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे ) या ब्रीद वाक्याने स्थापन करण्यात आली [२३]. या मेळाव्यात बाबुरावानी शिक्षणाबाबत सरकार किंवा स्कूल बोर्डासारख्या स्थानिक संस्थाकडून अशी अपेक्षा करणे व्यर्थ असल्याचे सूचित केले. या कार्यपूर्तीकरिता आपणाच स्वत: कंबर कसली पाहिजे. सुशिक्षितानी पुढाकार घेतला पाहिजे असे विचार मांडले. या समितीमार्फत स्कूल बोर्डाच्या शाळा नाहीत अशा गावात शंभर शाळा सुरू करण्याचा संकल्प जाहीर केला.

## बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीचे हेतू,उद्देश व तत्वे:

१) प्राथमिक शिक्षण व प्रौढ शिक्षणाचा बेळगाव जिल्हयात, विशेषत: खेडयात प्रसार करणे.

२) प्राथमिक शिक्षणासाठी दिवसाच्या व प्रौढ शिक्षणासाठी रात्रीच्या शाळाकाढून त्या चालविणे.

..

३) साक्षरता टिकविण्यासाठी शाळा, ग्रंथालय सुरू करणे व व्याख्यानाव्दारे व इतर मार्गाने जनतेत शिक्षणाविषयी आवड निर्माण करणे.

४) खेड्याच्या विकासासाठी मदत करणे.

५) प्राथमिक शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्ती, संघटना, स्थानिक मंडळे याना मदत करणे.

६) हे ध्येय साध्य करण्यासाठी केंद्रे व शाखा समितीतर्फे सुरू करणे.

७) प्राथमिक शिक्षणाबरोबर शेती व शेतीला पूरक उद्योगधंद्याचे ट्रेनिंग सेंटर्स आयोजित करून शेतकऱ्याना माहिती देणे.

८) जिल्हा पातळीवर शिक्षण प्रसार करणे.

नोट: सेव व त्याग ही समितीची मार्गदर्शक तत्वे असतील. समितीची वरीलप्रमाणे हेतू, उद्देश व तत्वे आहेत [२४].

## शाळांची उभारणी स्वालंबनाच्या तत्वावर:

बाबुराव ठाकूर यांनी समितीची दिनांक २२-१-१९४० रोजी सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट खाली नोंदणी करून घेतली [२५] व संस्थेस कायदेशीरपणा मिळवून दिला. बाबुराव ठाकूर यांनी समिती मार्फत शिक्षण प्रसारासाठी " व्हॉलेंटरी शाळा " ( मदत शाळा ) सुरू करण्याचे ठरविले. व्हॉलेंटरी स्कूलची मुळ कल्पना रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर डॉ.भाऊराव पाटील यांची होती. त्यानीच ती मुंबई सरकारला सादर केली होती [२६]. या व्हॉलेंटरी शाळा पूर्णत: स्वावलंबनाच्या तत्वावर सुरू करण्याचे ठाकूर यानी जाहीर केले.

..

## बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीचे संचालक मंडळ:

बाबुरावांचा बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती स्थापन करण्यात सिंहाचा वाटा असला, तरी सत्तेच्या मागे न धावणाऱ्या ठाकूरांनी समितीचे अध्यक्षपद बेळगावचे प्रसिध्द सामाजिक कार्यकर्ते डॉ.गो.वा.हेरेकर याना दिले व स्वत: सचिव बनले [२७]. समितीचे संचालक मंडळ प्रत्येक तीन वर्षांनी समिती सभासदांच्या सर्वसाधारण ( जनरल ) सभेत निवडले जात असत [२८]. समितीचे संचालक मंडळात वेळोवेळी बदल झाले आहेत, हे खालील तक्त्यावरून दिसून येईल [२९].

### संचालक मंडळ तक्ता

### बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती

सन १९३७ चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | श्री. डॉ.गोविंद वामन हेरेकर |
| २) | उपाध्यक्ष | .. | श्री. डॉ.गोविंद विठल सराफ |
| ३) | सेक्रेटरी | .. | श्री. धोंडो राजाराम ठाकूर |
| ४) | खजिनदार | .. | श्री. कृष्णाजी गोविंद याळगी |
| ५) | सभासद | .. | श्री. बोधराव विष्णु नाईक |
| ६) | सल्लागार | .. | एकूण १३ सभासद होते. |

..

## सन १९४० चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | श्री. डॉ. गोविंद वामन हेरेकर |
| २) | उपाध्यक्ष | .. | श्री डॉ. गोविंद विठल सराफ |
| ३) | सेक्रेटरी | .. | श्री. धोंडो राजाराम ठाकूर |
| ४) | खजिनदार | .. | श्री. बोधराव विष्णु नाईक |
| ५) | सल्लागार | .. | एकूण १३ सभासद होते. |

## सन १९४७ चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | डॉ. गोविंद वामन हेरेकर |
| २) | उपाध्यक्ष | .. | अॅड. गोविंद विठल सराफ |
| ३) | सेक्रेटरी | .. | श्री. बाबुराव राजाराम ठाकूर |
| ४) | खजिनदार | .. | श्री. कृष्णराव गो.याळगी |
| ५) | संचालक | .. | श्री. बोधराव वि.नाईक |
| ६) | मानद संचालक | .. | प्राचार्य एम.ए.बिडीकर |

## सन १९५० चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | श्री. चतुरदार शहा |

..

## सन १९५० चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | श्री. चतुरदास न.शहा |
| २) | उपाध्यक्ष | .. | ॲड. गोविंद वि.सराफ |
| ३) | सेक्रेटरी | .. | श्री. बाबुराव रा.ठाकूर |
| ४) | सभासद | .. | श्री. कृष्णराव गो.याळगी |
| ५) | सभासद | .. | श्री. रामकृष्णपंत जोशी |
| ६) | सभासद | .. | श्री. नारायण ग.नाईक |
| ७) | एक्स ऑफीसीओ सभासद. | .. | श्री. पी.एच.वाळवेकर |

## सन १९५३ चे संचालक मंडळ

| अ.नं. | पदाचे नाव | | व्यक्तिचे नाव |
|---|---|---|---|
| १) | अध्यक्ष | .. | श्री. चतुरदास शहा |
| २) | उपाध्यक्ष | .. | ॲड. गोविंदराव सराफ |
| ३) | सेक्रेटरी | ,. | श्री. बाबुराव ठाकूर |
| ४) | सभासद | .. | श्री. नारायणराव नाईक |
| ५) | सभासद | .. | श्री. रामकृष्णपंत जोशी |
| ६) | मानद सभासद | .. | या कमिटीने दोन मानद सभासद |
| ७) | मानद सभासद | .. | निवडावयाचे आहेत |

खानापूर तालुका दौरा:

शिक्षणाविषयी जनतेत जागृती निर्माण करण्यासाठी त्यानी प्रथमत: प्रचार दौरे आयोजित केले. त्याचा श्रीगणेशा खानापूर तालुक्यापासून केला. खानापूर तालुक्यात तारीख २८ ते ३१ आक्टोबर,१९३७ पर्यंत जवळ जवळ प्रत्येक गावात, की ज्या गावाना रस्ते नाहीत, वाटा नाहीत अशा अनेक गावात दौरे काढून खेड्यांची पाहणी व संपूर्ण ग्रामीण जीवनासंबंधीची व गरजांची माहिती मिळविली [३०]. या पाहणी दौ-यात गावची लोकसंख्या, शाळेत येऊ शकणारी मुले-मुली, शाळेसाठी जागा, विहीर, तलाव, जमीन, आरोग्य, गावातील व गाबाबाहेरील रस्ते, पाणंद, आदीबाबत माहिती जमा केली, कारण त्या माहितीच्या आधारे खेड्यातील शाळेचे व सामाजिक कार्याचे स्वरूप निश्चित करण्यात येणार होते. या प्रचार व पाहणी दौ-यात बाबुराव ठाकूर, सुठंणकर,बा.रं. पुंडलीकजी कवतगडे, वामनराव देसाई इ.समितीचे कार्यकर्त्यांनी खानापूर तालुक्यातील हटगी, हिमनोळी, नंदगड, मंडलवाडी, तिवोळी, गवाळी, शिवढाण, असोगा, कापोली, कामतगे, शिरोली इ. ३५ गावाना श्री.मल्लाप्पा होसमनी, राचप्पा होसमनी, बसाप्पा अरगावी, रा.सा. वागळ आदि प्रमुख कार्यकर्त्यां समवेत भेटी दिल्या. अनेक ठिकाणी सभा घेऊन शिक्षणाचे महत्व सांगितले. उदा. दिनांक २९-१०-१९३७ रोजी नंदगडच्या सभेत १० गावचे १,००० स्त्री-पुरूष जमले होते. त्याना बाबुरावानी शिक्षण हे शेतक-यांस, गावास व देशास विकासासाठी कसे आवश्यक आहे हे सांगितले.[३१].

..

चंदगड महालाकडील दौरा:

शिक्षण प्रसार व शाळा काढण्यासाठी चंदगड महालातील नागरिकांची सभा दिनांक ५-११-१९३७ रोजी चंदगड येथील श्रीरवळनाथाच्या मंदिरात आयोजित केली होती. त्यास तुर्केवाडी, हलकर्णी, तांबुळवाडी, पाटणे, हेरा, हिंडगाव व चंदवडचे मिळून ३०० प्रतिनिधी हजर होते [३२]. या सभेस बाबुराव ठाकूर, गोविंदराव सराफ, कुंठणकर बा.र. वामनराव देसाई, कृष्णराव याळगी इ.मंडळींनी मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्व सांगितले व समितीमार्फत ज्या गावात शाळा सुरू केल्या जातील त्या भागातील सुशिक्षितांना शिक्षक म्हणून घेतले जाईल असे सांगितल्याने महालात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

वृतपत्रातून शिक्षणाबाबत जागृती:

बाबुरावांनी चंदगड महाल व खानापूर तालुक्यात प्रचार दौरे काढून शिक्षणाविषयी अनेक ठिकाणी व्याख्याने देऊन अस्था निर्माण केली होती. तसेच तरूण भारत वृतपत्रातूनही " एकही निरक्षर अंगठेवाला राहू देऊ नका " [३३]. साक्षरतेच्या प्रचंड मोहिमेस मदत करा, शिक्षणाशिवाय विकास होणार नाही [३४], अशा मथळ्याखाली लिहून बाबुरावांनी जनतेत जागृती निर्माण केली म्हणून समितीच्या शाळा अनेक ठिकाणी सुरू झाल्या.

शाळा सुरू करण्याबाबतच्या अटी:

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या शाळा सुरू करण्याबाबत जे गाव खालील अटी पूर्ण करेल तेथे शाळा सुरू केली जाईल [३५] असे समितीतर्फे बाबुरावांनी जाहीर केले.

..

: अटी :

१) केडगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीकडे शाळा मागणीचे अर्ज ३० मार्चच्या आत स्कूल बोर्डाची शाळा नाही अशा गावातून, गावातील प्रमुख व्यक्तिंच्या सह्यानिशी करावेत.

२) अर्जात गावची, सभोवतालच्या खेड्याची माहिती, गावची लोकसंख्या, शाळेत येऊ शकतील अशा मुलांची संख्या अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

३) शाळेसाठी गावातून धान्य रूपाने व रोख पैशाच्या रूपाने किती मदत मिळू शकेल ते नमूद करावे.

४) शाळेसाठी जागा व इतर सोयी मिळू शकतील किंवा नाही याची सविस्तर माहिती पाठविणे आवश्यक आहे.

५) साक्षरता प्रसारासाठी प्रौढ मंडळी मिळू शकतील काय ? मिळत असल्यास त्यांची अंदाजे संख्या कळवावी.

६) शाळा सुरू झाल्यानंतर शिक्षण प्रसारासाठी त्या गावाने प्रतिवर्षी कमीत कमी ५० रूपये अगर तेवढयाच किंमतीचे धान्य देणगी म्हणून देणे आवश्यक राहील.

७) शाळेसाठी व शिक्षकांना राहण्यासाठी जागेची मोफत सोय गावाने करावी लागेल.

८) ज्या गावातील शाळेत कायम ३० किंवा त्यापेक्षा जास्त मुले येणेची गाव हमी घेत असेल तर.

इत्यादि अटी पूर्ण करणा-या गावात शाळा सुरु केल्या जातील असे जाहीर केले.

..

शिक्षक नेमणूकीच्या अटी:

ज्याना शिक्षकाच्या जागेसाठी अर्ज करावयाचा असेल त्याचे शिक्षण निदान मुल्की पर्यंत ( सातवी ) असावे. त्याने अर्ज को-या कागदावर करावा. त्यात अर्जदाराने वय, शिक्षण, शिक्षकाच्या कामाचा अनुभव इ. बाबतच्या सत्यप्रति संस्थेकडे पाठवाव्यात. शिक्षकाची निवड करताना त्या त्या गावातील किंवा विभागातील सुशिक्षिताना प्राध्यान्य देण्यात येईल [३६], असे सेक्रेटरी बाबुराव ठाकूर यानी जाहीर केले, कारण त्यामुळे त्या शिक्षकास ती शाळा आपली वाटेल व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करेल.

समितीचे शिक्षण विस्तार कार्य:

समितीची पहिली शाळा: (डिसेंबर,१९३७):

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितिची पहिली शाळा दिनांक १०-१२-१९३७ रोजी चंदगड महालातील " नांदवडे " यागावी स्थापन करण्यात आली. शिक्षक म्हणून श्री.भिमराव लक्ष्मण आचरेकर यांची नेमणूक करण्यात आली. यावेळी समितीचे सेक्रेटरी श्री.बाबुराव ठाकूर व गोविंदराव सराफ व कृष्णराव भालगी हे कार्यकर्ते उपस्थित होते [३७]. हे गाव मुख्य रस्त्यापासून दूर जंगलात होते. गाव केवळ ४०-५० घरांचे होते, पण लोकांच्या उत्साहामुळे बाबुराव वगैरेनी पायी चालत जाऊन ( कारण वाहनाची सोय नव्हती, रस्ता नव्हता ) तेथे शाळा सुरू केली.

..

समितीची दुसरी शाळा, खानापूर तालुक्यातील पहिली शाळा "गवाळी" या गावी तारीख १६-१२-१९३७ रोजी सुरू करून रामचंद्र परशुराम गावडे यांची शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली [३८]. हे गाव ६० घरांचे होते, लोकसंख्या ४००, तर शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या ४० होती, यावेळी बाबुराव ठाकूर उपस्थित होते.

स्कूल पंचाची नियुक्ती:

बाबुराव ठाकूर यानी स्थापन केलेल्या शाळा व्यवस्थित चालाव्यात म्हणून दोन्ही गावातील नागरिकांच्या विचाराने ५ ते ६ लोकांची एक "स्कूल पंच कमिटी" नेमली होती [३८(अ)]. या कमिटीने गावातील जास्तीत जास्त मुले-मुली शाळेत आणणे, त्याना दररोज शाळेत येण्यास सांगणे, शाळेच्या जागेचा व शिक्षकांच्या रहाण्याची व्यवस्था करणे, शिक्षकांस गावातील ग्रामोध्दाराच्या कार्यात मदत करणे. ही कामे करावी लागत असत. पंच कमिटीने केलेल्या कार्याचा अहवाल प्रति आठवड्यास समितीला पाठवावा लागत असे.

त्यानंतर समितिकडे अनेक गावचे अर्ज शाळा काढा म्हणून आले होते. जानेवारी १९३८ पर्यंत चंदगड महालातील (१) नांदवडे, खानापूर तालुक्यातील (१) गवाळी (२) शिरोली (३) वड्डेबैल (४) निट्टूर (५) असोगे या सहा ठिकाणी समितीच्या शाळा स्थापन झाल्या. त्यात एकूण १३० मुले शिक्षण घेत होती [३९(ब)].

समितीच्या शाळेच्या संख्येत वाढ:

समितीने सुरू केलेल्या शिक्षण प्रसार कार्यास गती आली, कारण बाबुराव ठाकूर व समितीचे कार्यकर्ते ज्या गावात शाळेसाठी जात असत तेथे प्रथमत: गावकऱ्याच्या सोबत स्वत: खोरे-फावडे घेऊन गाव स्वच्छता मोहिम पार पाडत असत. त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण होत असे.

तसेच मुंबई राज्याच्या कॉंग्रेस सरकारने जून १९३८ मध्ये खाजगी शाळा काढणाऱ्याना सहाय्य व उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे[४०] शाळेच्या संख्येत विलक्षण वाढ झाल्याचे खालील तक्त्यावरून दिसून येईल.

| साल | शाळेची संख्या | मुलांची संख्या |
|---|---|---|
| १९३७-१९३८ | ६ | १३० |
| १९३८-१९३९ | ५३ | १४०० |
| १९३९-१९४० | ९१ | २२८० |
| १९४०-१९४१ | १०६ | ३५०० |
| १९४१-१९४२ | १२६ | ५००० |

वरील १२६ शाळांपैकी उर्दू माध्यमाची एक, मराठी माध्यमाच्या ८७ व कानडी माध्यमाच्या ३८ शाळेपैकी ३ लमाण वस्तीवर व एक हरिजन वस्तीवर आहे. सन १९४२ मध्ये समितीच्या शाळेत एकूण ५,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ७०० मुली, ४०० हरिजन मुले व १५० मुस्लिम व ५० ख्रिश्चन मुले होती.[४१]

बेळगाव परिसरात शिक्षणाचा प्रचार झाला होता, खेड्यातील लोकाना शिक्षणाचे महत्व समजले होते, म्हणून लोक गावातून समितीकडे शाळा काढण्यासाठी अर्ज आले होते. तेंव्हा बाबुराव ठाकूर यानी बेळगाव परिसरात शिक्षण प्रसारासाठी अनेक शाळा स्थापन केल्या. अल्पावधीतच मराठी, कानडी व उर्दू माध्यमाच्या शाळांची संख्या १८० पर्यंत गेली [४२]. त्यातील कांही शाळा पूर्वीपासूनच स्थानिक समितीमार्फत चालविल्या जात होत्या. पण आर्थिक अडचणीमुळे त्या बंद होण्याच्या

..

मार्गावर होत्या. तेंव्हा अशा शाळा स्थानिक समितीच्या सल्ल्याने बाबुरावानी समितीस जोडून टाकल्या, पण त्यांची संख्या केवळ दोनच आहे. (शहापूर व राजापूरवाडी येथील शाळा ).

बाबुराव ठाकूर यानी समितीमार्फत ज्या १८० 'मदत शाळा' स्थापन केल्या होत्या त्याची माहिती पुढील तक्त्यात दिली आहे [४३].

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीच्या प्राथमिक शाळांचा तक्ता:

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीने बेळगाव जिल्ह्यात चालविलेल्या मराठी, कानडी, व उर्दू शाळांची उपलब्ध माहितीनुसार ही यादी देत आहोत. या केवळ शाळा नव्हत्या, तर त्या त्या गावातील रचनात्मक कार्याची ती केंद्रे होती. या शाळेतील शिक्षकांनी अल्प वेतनावर जनसेवेचे अहोरात्र कार्य केले. ज्ञानार्जनाबरोबर गावक-यात सामाजिक जागृती केली.

बेळगाव तालुका

मराठी शाळा:

| | | |
|---|---|---|
| १) नानावाडी | २) बडस | ३) मरणहोळ |
| ४) वसगे | ५) बिदरभावी | ६) दुंडगे |
| ७) निटदूर | | |

कन्नड शाळा:

| | | |
|---|---|---|
| १) एस.हलगी मरडी | २) बेंचिनमर्डी | ३) गेजपती |
| ४) कामेवाडी | | |

..

## खानापूर तालुका

### मराठी शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | खैरवाड | २) | वरगाव | ३) | तिवोली |
| ४) | इटुंजवाड | ५) | मन्तापूर | ६) | असोगा |
| ७) | संगरगाळी | ८) | निट्टूर | ९) | वाडेबैल |
| १०) | हलसाळ | ११) | सगरे | १२) | हत्तरवाड |
| १३) | गुंडाप्पी | १४) | पारवाड | १५) | हुलनूड |
| १६) | मान | १७) | तळवडे | १८) | चिंगुले |
| १९) | हब्बनहट्टी | २०) | कापोली | २१) | चापोली |
| २२) | उचवडे | २३) | बीदरमावी | २४) | हत्तरगुंडी |
| २५) | अंकले | २६) | गणेबैल | २७) | भाजगाळी |
| २८) | तिवोलीवाडा | २९) | शिरोळी | ३०) | गवळी |
| ३१) | हेमाडेगे | ३२) | जरने शिंपिवाडी | ३३) | डिग्गेगाळी |
| ३४) | दुधवाळ-मोहीशेट | ३५) | सिताववडे | ३६) | नरसेवाडी |
| ३७) | भुरनाकी | ३८) | कोकना-नावगा | ३९) | होकल |
| ४०) | हारुरी | ४१) | सावरगाळी | ४२) | मुंडवाड |
| ४३) | हालशी | ४४) | गणेबैल | | |

### कन्नड शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | मंगिनकोप | २) | हिंडलगे | ३) | कंकी बसरीकट्टी |
| ४) | कसमळगी | ५) | मुरंकी | ६) | हुली कोटट्टल |
| ७) | घस्टोली दड्डी | ८) | कमसेनकोप | ९) | गाडीकोप |
| १०) | हीरी अंग्रोळी | ११) | बोण्णूर | १२) | मुगळी हाळ |

..

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३) | चुंचवाड | १४) | अवरोळी | १५) | कट्टन बागेवाडी |
| १६) | बेदरहट्टी | १७) | लिंगनमठ | १८) | गुडेनहट्टी |
| १९) | गोळी हळ्ळी | २०) | गंदिगवाड | | |

## बैलहोंगल तालुका

कन्नड शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | देमट्टी | १) | एमिनकट्टी | ३) | गणीकोप्प |
| ४) | गुडीकट्टी | ५) | जालीकोप | ६) | कडतनहाळ |
| ७) | कोटवागी | ८) | मरगनकोप्प | ९) | मच्याळ |
| १०) | नानागुंडीकोप्प | ११) | सावटगी | १२) | शिगिहळ्ळी |
| १३) | तिम्मापूर | १४) | गुलेरदड्डी | १५) | अमरापूर |
| १६) | कुल्लोळी | १७) | बेंचिनमड्डी | १८) | होन्नीडिब्ब |

## गोकाक तालुका

कन्नड शाळा:

| | | | |
|---|---|---|---|
| १) | हुलीकट्टी | २) | अरभावीमठ |

## सौंदत्ती तालुका

कन्नड शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | आचमट्टी | २) | आलदकट्टी | ३) | चिक्क उल्लीगेरी |
| ४) | एनगी | ५) | हिटंगी | ६) | हुलीकेरी तांडे |
| ७) | कोलरकट्टी | ८) | कारलकट्टी तांडे | ९) | करीमनी |
| १०) | कात्राळ | ११) | कुसलापूर | १२) | मत्तीकुळी |
| १३) | रामापूर तांडे | १४) | शिंगारकोप्प | १५) | इंगनाळगी |

..

उर्दू शाळा:

१) होसूर

## चिक्कोडी तालुका

मराठी शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | अमल झारी | २) | कुदालमुख | ३) | चुंदरटेक |
| ४) | गायकवाडी | ५) | गवन | ६) | गजबरवाडी |
| ७) | चिक्कोडी रोड | ८) | गिरगांव | ९) | खोतवाडी |
| १०) | कोडणीवाडी | ११) | राजापूरवाडी | १२) | शहापूर |
| १३) | सुळगांव | १४) | यद्यानवाडी | १५) | धुळगनवाडी |
| १६) | नाईंग्लज | १७) | कारापूर | १८) | मानेवाडी |
| १९) | मांजरीवाडी | २०) | शिवापूरवाडी | | |

कन्नड शाळा:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | हद्यानहट्टी | २) | कुप्पनहट्टी | ३) | रूपीनाळ |
| ४) | वादराळ | ५) | गिरगांव | | |

## हुक्केरी तालुका

मराठी शाळा:

१) नमाजवाडी

कन्नड शाळा:

१) यली मनोळी (हरिजन)

..

## <u>अथणी तालुका</u>

**मराठी शाळा:**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहापूर | २) | |

## चंदगड तालुका (कोल्हापूर)

**मराठी शाळा:**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | वागिलगे | २) | कुर्णी बुझावडे | ३) | रेडी कानूर |
| ४) | गवसे | ५) | गुडेवाडी | ६) | हुंबरवाडी |
| ७) | इस्लापूर | ८) | जंगमहट्टी | ९) | कलसगाडे |
| १०) | कारंजगाव | ११) | केरवाडे | १२) | कोकरे |
| १३) | कोनेवाडी | १४) | कोळींद्रे (इनाम) | १५) | कोळींद्रे (खालसा ) |
| १६) | माडवळे | १७) | महाळुंगे | १८) | मुगळी |
| १९) | नागनवाडी | २०) | नांदवडे | २१) | शिरगाव |
| २२) | उत्साळी | २३) | कारवे | २४) | वेरडी कारवे |
| २५) | कारजे | २६) | मालगेवाडी | २७) | मोर्ले |
| २८) | सातवणे | २९) | पार्ले | ३०) | हलकर्णी |

---

..

## शाळेचा तालुका निहाय तक्ता

| अ.नं. | तालुका | मराठी माध्यम शाळा | कानडी माध्यम शाळा | उर्दू माध्यम शाळा | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १) | बेळगाव | ७ | ४ | - | १ |
| २) | खानापूर | ४४ | २० | - | ६४ |
| ३) | बैलहोंगल | - | १८ | - | १८ |
| ४) | गोकाक | - | २ | - | २ |
| ६) | सौंदत्ती | - | १५ | १ | १६ |
| ७) | चिक्कोडी | २० | ५ | - | २५ |
| ८) | हुक्केरी | १ | १ | - | २ |
| ९) | अथणी | १ | - | - | १ |
| १०) | चंदगड (कोल्हापूर) | ३० | - | - | ३० |
| | एकूण | १०३ | ६५ | १ | १६९ |

सुपरवायझर्सच्या नेमणूका:

समितीच्या शाळांची संख्या दिवसे दिवस वाढत गेल्याने त्यावर देखरेख करणे, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या दूर करणे, शक्य होईनासे झाले. तसेच शिक्षण प्रसार कार्यक्षमपणे व्हावा म्हणून समितीचे सेक्रेटरी बाबुराव ठाकूर यानी समितीच्या कार्यक्षेत्राचे पाच विभाग पाडून त्यावर सुपरव्हायझर्स नेमले [४४]. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

..

## सुपरवायझर्सचा तक्ता

| अ.नं. | नाव | | विभाग |
|---|---|---|---|
| १) | श्री. गुणाजी के.एन. ( १९३७ ते १९५० ) | मराठी भाग | खानापूर तालुका |
| २) | श्री. गचीहल्ळीशेटी व्ही.आर. ( १९३७ ते १९६४ ) | कन्नड भाग | सौंदती,खानापूर |
| ३) | श्री. अंद्राज जे.जे. ( १९५० ते १९५६ ) | मराठी भाग | खानापूर तालुका |
| ४) | श्री.शिरगांवकर बी.ए. ( १९३७ ते १९६६ ) | मराठी भाग | चंदगड, निपाणी, चिक्कोडी. |

कामे:

प्रत्येक विभागाच्या सुपरवायझर्सनें आपआपल्या विभागाच्या शाळाना भेटी देणे, शाळेच्या अडचणी जाणून घेणे, मुलांची उपस्थिती, शाळेस गावचे सहकार्य मिळते का नाही पाहणे, शिक्षक ग्रामोध्दारकार्य व खेड्याच्या आरोग्याकडे लक्ष देतात की नाही हे पाहणे. सुपरवायझर्सनी आपल्या पाहणी व कार्याचा अहवाल प्रत्येक आठवड्यास समितीला देणे बंधनकारक होते, त्यामुळे शिक्षण प्रसारकार्य कार्यक्षमपणे चालू लागले.

शिक्षकांचा पगार वाटप:

त्यावेळी समितीच्या शिक्षकांचा पगार शाळेच्या गावी होत नसे. तर ज्या तालुक्यात ज्या शाळा आहेत, त्या तालुक्यातील सर्व शाळातील

..

शिक्षकांचा पगार तालुक्याच्या किंवा मध्यवर्ती ठिकाणी सर्व शिक्षकांना ठराविक तारखेस बोलावून वाटप केले जाई [४५]. कारण समितीचे सर्व शिक्षक एकत्र येतील तेथेच त्यांच्या अडचणी समजतील व त्या सोडविण्याचा प्रयत्न करता येईल, म्हणून तालुक्यातील सर्व शिक्षकांना कळवून पगार एका ठराविक ठिकाणी, ठराविक तारखेस वाटप केला जाई.

बेळगाव जिल्ह्याच्या काना-कोपऱ्यात मराठी, उर्दू, कानडी शाळा काढून त्यांची प्रशासकीय घडी नीट बसवून बाबुराव थांबले नाहीत, तर त्यांनी निर्माण केलेल्या ' शैक्षणिक विश्वातून ' चांगला, सुसंस्कृत विद्यार्थी घडावा याकरिता त्यांनी जातीने प्रयत्न केले. विद्यार्थ्याला कोणते संस्कार करावेत याविषयी त्यांचे विचार ठाम होते. त्यात त्यांनी खालील बाबीवर भर दिला होता.[४६]

१) व्यसनापासून अलिप्त ठेवणे: तंबाखू, दारू, विडी, सिगार, मादक पेय इ.पासून विद्यार्थ्यांने दूर रहावे असा संस्कार करणे.

२) विद्यार्थ्यांवर अहिंसेचा संस्कार करणे.

३) चांगल्या वाणीचा संस्कार करणे, कारण भाषेमुळे माणसाची संस्कृती कळते, भाषेमुळे इतरांची मने दुखावली जाणार नाहीत अशी वाणी शिकविणे.

४) समितीच्या शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी मनाने, विचाराने उच्च निघाला पाहिजे.

असे संस्कार विद्यार्थ्यांवर होत असल्यामुळे या शाळेतून बाहेर पडलेला विद्यार्थी उच्च विचार घेऊन पडत असे. त्यामुळे तो कोठेही अपयशी ठरत नव्हता.

..

## शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन:

आपल्या शाळेमधून उच्च, दर्जेदार शिक्षण देण्यात यावे याविषयीसुध्दा बाबुराव जागरुक होते. शिक्षणाचा दर्जा बहुतांशी शिक्षकांच्या गुणवत्तेवर निर्धारीत असतो. सामान्य शिक्षकापेक्षा प्रशिक्षित शिक्षक विद्यादानाचे कार्य अधिक प्रभावीपणे, सखोलपणे, समर्थपणे करू शकतो हे बाबुरावांनी बरोबर हेरले होते. पण शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची सोय जवळपास उपलब्ध नव्हती. ती अडचण कांही अंशी दूर करण्यासाठी समितीच्या शिक्षकासाठी प्रशिक्षण शिबीरे आयोजित केली.

### १) शिक्षक परिषद:

बाबुराव ठाकूर व इतर संचालकांनी दिनांक ५ डिसेंबर,१९३८ रोजी बेळगाव शहरातील राणीच्या बागेत समितीच्या सर्व शिक्षकांची शिक्षण परिषद मुंबई राज्याचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री मा.ना.बाळासाहेब खेर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली होती [४७]. तीचा उद्देश खालीलप्रमाणे होता:

१) शिक्षकांची शारिरीक व बौध्दीक पातळी उंचावणे,
२) शिक्षणाचा दर्जा उंचावणे.
३) शिक्षणाविषयी जनतेत जागृती कारणे, इत्यादि.

### २) प्रशिक्षण शिबीरे:

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीचे शिक्षक फक्त मुलकी परीक्षा ( इयत्ता सातवी ) पास झालेले होते. तेंव्हा शाळांचा व

..

शिक्षकांचा दर्जा वाढवून शैक्षणिक कार्य प्रभावीपणे करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षित असणे आवश्यक होते. पण जवळपास अध्यापक महाविद्यालय नसल्याने ते शक्य नव्हते. तेंव्हा संस्थेचे अध्यक्ष डॉ.हेरेकर व सचिव बाबुराव ठाकूर यांनी समितीच्या शिक्षकांसाठी नागनवाडी, तालुका चंदगड येथे दिनांक १ ते १५ जून,१९४१ अखेर व हलकर्णी, तालुका चंदगड येथे दिनांक २८ मे ते ६ जून,१९४२ अखेर प्रशिक्षण शिबीरे भरवून शिक्षकांची शारीरिक व बौध्दिक गुणवत्ता वाढविण्यासाठी नामवंत व्यक्तिंची व्याख्याने आयोजित केली होती [४८]. पण त्यामुळे प्रशिक्षीत शिक्षणाची गरज पूर्ण होणार नव्हती म्हणून त्यांनी अध्यापक महाविद्यालय सुरू करण्याचे ठरविले. अशा प्रकारच्या महाविद्यालयाची आवश्यकता खालील कारणाकरिता होती [४९].

१) शिक्षण व शिक्षकांचा दर्जा उंचावणे.

२) बेळगावच्या आसपास एकही अध्यापक महाविद्यालय नव्हते, फक्त पुणे, रत्नागिरी येथे सरकारी व सातारा येथे खाजगी ( रयत शिक्षण संस्थेचे ) अध्यापक महाविद्यालय होते. समितीच्या शिक्षकांची संख्या जास्त असूनही प्रतिवर्षी एक किंवा दोन शिक्षकांना प्रवेश मिळत असे. त्यामुळे प्रशिक्षित होण्याची शिक्षकांची इच्छा पूर्ण होत नव्हती. तेंव्हा शिक्षकांची ही अडचण दूर करण्यासाठी अध्यापक महाविद्यालयाची आवश्यता होती.

३) समितीच्या शिक्षकांची आर्थिक परिस्थिती बेताचीत असल्यामुळे दूर गावी राहून खर्च करणे अशक्य होते.

४) समितीच्या जास्तीत जास्त शिक्षकांना प्रशिक्षित करणे.

५) शिक्षण खात्याने, मुंबई राज्यातील सर्व शिक्षकांना दहा वर्षांत प्रशिक्षित झाले पाहिजे, असे १९४२ मध्ये जाहीर केले होते, पण बेळगाव जिल्ह्यात ४५० अप्रशिक्षित शिक्षक होते. त्यात सावंतवाडी, वेंगुर्ला या जवळपासच्या भागातील शिक्षक संख्या मिळविली तर संख्या वाढणार व प्रतिवर्षी ३० ते ३५ शिक्षकांना प्रशिक्षित करावयाचे ठरविले तर १५ वर्षांहून अधिक काळ लागेल.

या पार्श्वभूमीवर १७ जून,१९४२ रोजी बेळगाव शहरातील महिला विद्यालयात, अध्यापक महाविद्यालयाची स्थापना करून त्याचे उद्घाटन त्यावेळचे मुंबई राज्याचे शिक्षण खात्याचे संचालक श्री. एस.एम. मुस यांच्या हस्ते केले [५०].

महाविद्यालयाची प्रगती:

अध्यापक महाविद्यालय हे केवळ प्रशिक्षित शिक्षक तयार करण्याचा कारखाना ( संस्था ) न बनता, ती संस्था समाज कल्याणाचे केंद्र बनावे, महाविद्यालयाने निकालाची उत्कृष्ट परंपरा निर्माण करावी, ते एक सांस्कृतिक केंद्र बनावे असा बाबुराव ठाकूर यांचा सतत प्रयत्न असे, त्यामुळे येथे हिंदी, संस्कृतच्या परीक्षा घेतल्या जात असत. आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा घेतल्या जात असत किंवा नैसर्गिक आपत्ती प्रसंगी मानवतेच्या भूमिकेतून आर्थिक मदतीचा हात देण्यात हे महाविद्यालय कधीच मागे नव्हते [५१].

..

तसेच महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या सरकारच्या मान्यतेनुसार कमी जास्त होत असली तरी पण महाविद्यालयाने निर्माण केलेल्या निकालाची उत्कृष्ट परंपरा खालीलप्रमाणे होती [५२].

| अ.नं. | साल | एकूण संख्या | मुले | मुली | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९४२ | ५० | ४६ | ४ | - |
| २) | १९४३ | १०० | ९२ | ८ | ६० टक्के |
| ३) | १९४४ | १०० | १०० | - | ७० टक्के |
| ४) | १९४५ | १०० | ९२ | ८ | ६० टक्के |
| ५) | १९५० | १६४ | १५८ | ६ | ८० टक्के |
| ६) | १९५१ | २०४ | १९४ | १० | ७० टक्के |
| ७) | १९५२ | १८० | १६४ | १६ | ५० टक्के |
| ८) | १९५३ | १८२ | १२५ | ३७ | ६२ टक्के |

महाविद्यालयाच्या प्रगतीस व उत्कृष्ट निकाल परंपरेस प्राचार्यांचे विशेष परिश्रम कारणीभूत ठरले. या महाविद्यालयास श्री.बीडीकर एम.ए. (१९४२-४६), श्री.वाळवेकर पी.एच. (१९४७-५२), श्री.गोडबोले बी.जी. (१९५२-५३), श्रीमती इंदिरा संत (१९५३- ) असे कार्यक्षम प्राचार्य लाभले [५३]. त्यांच्या प्रयत्नाने अध्यापक महाविद्यालय नावलौकीकास आले. अनेक मान्यवर प्रभूतींनी या संस्थेस वेळोवेळी भेटी दिल्या. दत्तो वामन पोतदार ( इतिहासकार ), वि.द.घाटे (लेखक), तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (विचारवंत). सी.डी.देशमुख (अर्थमंत्री,भारत सरकार), आचार्य अत्रे (टीकाकार),आदि राजकीय, सामाजिक, साहित्यीक,मान्यवरांनी महाविद्यालयास भेट देऊन महाविद्यालयाच्या एकूण प्रगतीबद्दल गौरवोद्गार काढले [५४].

बाबुराव ठाकूर प्राथमिक किंवा अध्यापक शिक्षण प्रसारापर्यंतच थांबले नाहीत, तर बेळगाव परिसरातील तरुणांना उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन दिली.

बेळगाव जिल्हा व शहर हे मराठी भाषिकांचे प्रमुख केंद्र असूनही शहरात सन १९४८ पर्यंत लिंगायत एज्यूकेशन सोसायटीचे ( सध्याची लिबरल एज्यूकेशन ) " लिंगराज कॉलेज " हे एकच उच्च शिक्षण देणारे महाविद्यालय होते. या महाविद्यालयात विद्यार्थी संख्या जास्त, शिवाय तेथे कानडी भाषिकांचे वर्चस्व होते, म्हणून मराठी भाषिक, विशेषत: खेड्यातील विद्यार्थ्यांची कुचंबणा होत असे.

## महाविद्यालय काढण्याचा संकल्प:

समितीने मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय काढून मराठी भाषिकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन द्यावी असा विचार बाबुराव ठाकूर यांच्या मनात घोळत होता. संधी चालून येताच ती कृतीत उतरविली.

सावंतवाडी येथे " साऊथ एज्यूकेशन सोसायटीतर्फे " राणी पार्वतीदेवी महाविद्यालय सन १९४६ पासून सुरु होते. पण कोकणातील मलेरियाच्या साथीमुळे हे महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर होते. त्यामुळे बाबुराव ठाकूर व डॉ. हेरेकर यांनी हे महाविद्यालय बेळगावला आणून चालू ठेवण्याचे ठरविले. त्यासाठी आण्णासाहेब लठ्ठे यांच्या वाड्यात नागरिकांची सभा आयोजित केली [५५] होती. त्यात महाविद्यालय सुरु करण्याचा संकल्प केला.

त्यानुसार जून १९४८ पासून बेळगाव येथे " राणी पार्वतीदेवी महाविद्यालय ( कला व विज्ञान ) " सुरू केले [५६]. या महाविद्यालयात पहिल्या वर्षी पुढील वर्ग सुरू केले होते. त्यामध्ये पुढीलप्रमाणे विद्यार्थी संख्या होती [५७].

| साल | विभाग | संख्या | विभाग | संख्या |
|---|---|---|---|---|
| १९४८-४९ | एफ.वाय.(कला) | ७५ | एफ.वाय.(विज्ञान) | १०० |
| | इंटर (कला) | ४५ | इंटर (विज्ञान ) | ७५ |
| | बी.ए. (कला) | २८ | एम.एस्सी.(सिनियर) व ज्युनियर | ०६ |
| | पी.एच.डी. | ०३ | | |
| | एकूण संख्या .. | १५१ | एकूण संख्या .. | १८१ |

हे महाविद्यालय आदर्श बनावे, मराठी भाषिकांच्या आशेचे केंद्रस्थान बनावे यासाठी बाबुराव, समितीचे कार्यकर्ते, प्राचार्य, प्राध्यापक वर्ग सतत झटत होता. त्यामुळे या महाविद्यालयाती संख्या दिवसें दिवस वाढत होती, म्हणून पुढे महाविद्यालयाची संख्या एक हजार विद्यार्थ्यापेक्षा जास्त झाल्यामुळे समितीने नियमाप्रमाणे राणी पार्वतीदेवी ( कला ) व सस्सेरिया ( विज्ञान ) अशी विभागणी केली [५८]. आज या दोन्ही महाविद्यालयाची संख्या २,५०० पेक्षा जास्त आहे.

बाबुराव ठाकूर: प्रौढ शिक्षण प्रसार:

निरक्षरता हा भारतीय समाजास लागलेला एक कलंक आहे. त्यामुळे समाज प्रगती करू शकत नाही, समाजात अनेक वाईट प्रथा

..

रूढ होऊन समाज त्यात गुरफटला होता. त्यातून समाजाची सुटका करण्यासाठी समितीने साक्षरता प्रसार मोहिम हाती घेतली. तसेच साक्षरता प्रसारासाठी, प्रौढासाठी रात्रशाळा काढणे हे समितीचे ध्येय होते. म्हणून ज्या गावात जास्त प्रौढ निरक्षर असतील त्यानी प्रौढ शिक्षणाच्या शाळेसाठी समितीकडे अर्ज करावेत असे समितीने जाहीर केले. त्यानुसार खालील गावच्या लोकानी अर्ज करताच त्या त्या गावाना बाबूराव ठाकूर यानी भेटी देऊन, त्याना साक्षरतेचे महत्व पटवून देऊन प्रौढ शिक्षणाच्या शाळा सुरू केल्या.[५९]

<u>प्रौढ शिक्षणाच्या शाळेचा तक्ता</u>

| अ.नं. | गावाचे नाव | | प्रौढ शिक्षण शाळा सुरू केल्याची तारीख |
|---|---|---|---|
| १) | खोतवाडी | ... | ५-८-१९३८ |
| २) | शिरगांव | ... | १०-८-१९३८ |
| ३) | कोकरे | ... | १-१०-१९३८ |
| ४) | नागणवाडी | ... | २१-११-१९३८ |
| ५) | चेंदूरटेक | ... | १-२-१९४१ |

अशाप्रकारे प्राथमिक शिक्षणाबरोबर शेतकऱ्यांना, मजूरांना साक्षर करण्यासाठी त्यांच्या सोयीनुसार रात्री ७-०० ते ९-०० पर्यंत शाळेची वेळ ठरवून शाळा सुरू केल्या.

बाबूराव ठाकूर यांच्या दुसऱ्या कालखंडात शिक्षण प्रसार करीत असताना प्राथमिक शाळा, अध्यापक महाविद्यालय, राणी पार्वतीदेवी महाविद्यालय स्थापन केल्यानंतर त्यांना कोणकोत्या अडचणी उभ्या राहिल्या होत्या. ..

## शिक्षण प्रसारातील अडचणी:

बाबुरावाना शिक्षण प्रसाराच्या कार्यात अनंत अडचणी आल्या. त्यातील प्रमुख आणि मूलभूत अडचण आर्थिक स्वरूपाची होती. शाळेचे साहित्य, शिक्षक, व शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा पगार देणे हे आर्थिक बळाशिवाय अशक्य होते. समितीचे आर्थिक बळ तुटपुंजे होते, पण बाबुरावानी आर्थिक अडचणीमुळे शिक्षण प्रसाराचे कार्य अर्ध्यावर सोडले नाही. त्यानी विविध मार्गाने पैसा उपलब्ध करून शिक्षण प्रसाराचे राष्ट्रीय कार्य यशस्वीपणे राबविले. समितीच्या उत्पन्नाची साधने (अ) सरकारी अनुदान (ब) सभासद वर्गणी (क) देणगी वगैरे होती.

### अ) सरकारी अनुदान:

'व्हॉलंटरी स्कूल' ( मदत शाळा ) याना सरकारी अनुदान मिळत असे. या अनुदानातून शिक्षक व इतर कर्मचा-यांचा पगार भागविला जात असे. हे अनुदान किती मिळत असे याची माहिती उपलब्ध नाही, पण १९४१ मध्ये बारा हजार रूपयाचे अनुदान मिळाल्याचा उल्लेख सापडतो [६०]. शाळा सुरू झाल्यानंतर शाळाना अनुदान मिळण्यास जवळ जवळ तीन वर्षे लागली [६१]. पण तीन वर्षात शाळा कशा चालवावयाच्या हा प्रश्न समोर होता. यासाठी बाबुरावानी खाली नमूद केलेल्या मार्गाने पैसा उभा करण्याचा प्रयत्न केला.

### ब) संस्था सभासद वर्गणी:

शाळा उभारणीच्या कार्यात मुख्य अडचण पैशाची होती. तो उभा करण्याचा, सभासद वर्गणी मार्फत उभा करण्याचा एक मार्ग होता.

..

वर्गणीच्या आधारे सभासदांचे विविध वर्ग निर्माण करण्यात आले होते [६२]. ते खालील तक्त्यावरून दिसून येते.

१) संस्थेचे पेट्रन्स: रू.५०० किंवा त्याहून अधिक वर्गणी देणारे
२) संस्थेचे फेलोज:रू.२५० किंवा त्याहून अधिक वर्गणी देणारे
३) संस्थेचे लाईफ मेंबर: रू.१०० किंवा त्याहून अधिक वर्गणी देणारे
४) संस्थेचे मेंबर: रू.६ वार्षिक देणगी देणारे
५) संस्थेचे सहाय्यक मेंबर: वार्षिक रू.६-०० पेक्षा कमी देणगी देणारे.

वरीलप्रमाणे अनेकांना सभासद करून वर्गणीतून बाबुरावानी पैसा गोळा केला.

क) देणगीव्दारे:

संस्थेचा व्याप सतत वाढल्यामुळे पैशाची अडचण भासू लागली. तेंव्हा बाबुरावानी जनतेला मदतीचे आवाहन करू लागले. अनेकांचा त्याना योग्य प्रतिसाद मिळाला. अनेकांनी शिक्षण प्रसाराच्या राष्ट्रीय कार्यास सढळ हाताने देणगी दिली [63].

तसेच राणी पार्वतीदेवी महाविधालयाच्या उभारणी प्रसंगी बाबुरावाना पैशाची अत्यंत गरज होती. समितीकडे पैसा नव्हता म्हणून शहरात अहोरात्र फिरून बाबुराव व डॉ.हेरेकरानी अवघ्या तीन महिन्यात साडेतीन लाख रूपयाची देणगी जमा केली.

..

इतर अडचणी:

आर्थिक अडचणी शिवाय पुढील अडचणी होत्या.

१) समितीने सुरू केलेल्या शाळेस स्कूल बोर्डाची मान्यता आवश्यक होती, पण स्कूल बोर्डाचे सभासद ब्रिटीश धार्जिने असल्याने, आकसाने ते अशा शाळाना मान्यता नाकारत असत. पण खेर मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यावर ( १९३७ ) सरासरीने दररोज २० मुले असणाऱ्या शाळाना तात्काळ मान्यता देणारा कायदा केला, त्यामुळे ही अडचण दूर झाली [६४].

२) शाळा सुरू करण्या अगोदर शाळेसाठी जागा मिळवावी लागे, आणि त्याकरिता बराचसा पैसा मोजावा लागणार होता. हा खर्च समितीस झेपणारा नव्हता. पण बाबुरावांनी यातून मार्ग काढला. ज्या गावात शाळा काढावयाची आहे, त्या गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिना भेटून शिक्षणाचे महत्व आवश्यकता सांगत असत. तेंव्हा बाबुरावानी शिक्षण प्रसाराची तळमळ पाहून शाळेसाठी विनामुल्य जमिनी देऊन बाबुरावांच्या शिक्षण प्रसाराच्या बहुमोल कार्यास हातभार लावला.

जमिनी व्यतिरिक्त जेंव्हा जेंव्हा गावातील श्रीमंत व्यक्ति देणग्या देत असत, तेंव्हा त्याचा विनियोग बाबुरावांनी शाळेच्या इमारती व शालेय साहित्य खरेदी करण्यासाठी केला. एवढेच नव्हे तर, अनेक ठिकाणी बाबुराव स्वत: हातात खोरे-फावडे घेऊन गावकऱ्यांच्या मदतीने शाळेच्या इमारती उभ्या करून शाळा बांधणीवर होणारा खर्च टाळीत असत [६५].

३) शिक्षण प्रसारातील दुसरी महत्वाची अडचण म्हणजे, कांही ठिकाणी विघ्नसंतोषी लोकांनी बाबुरावांच्या कार्यास जाणीवपूर्वक खिळ घालण्याचा प्रयत्न केला. त्यानी समितीस अंतर्गत विरोध करण्यास

..

सुरूवात केली. उदा. चंदगड महालात " मित्रमंडळ " नामक संस्थेने या ब्राम्हणांच्या शाळा, त्यात आपली मुले पाठवू नका, आम्ही तुम्हास नवीन शाळा देतो, त्यातच तुमची मुले पाठवा, समितीस वर्गणी देऊ नका, मदत करू नका, असा अपप्रचार केला.[६६] त्यामुळे कांही काल त्या भागात समितीस विरोध झाला. पण कालांतराने समितीच्या उदात्त कार्याची कल्पना लोकांच्या लक्षात येताच विरोध नाहीसा झाला . म्हणून चंदगड महालात शिक्षण प्रसार कार्यास पुन्हा वेग आला.

४) मराठी अध्यापक महाविद्यालयात बाबुरावांनी प्रथमपासून सहशिक्षण योजना राबविली. पण सन १९४४ मध्ये मुंबई सरकारने मुलांच्या अध्यापक महाविद्यालयात मुलींना प्रवेश देऊ नये, दिल्यास मान्यता काढून घेतली जाईल असा आदेश काढला. तेंव्हा हा आदेश सरकारने रद्द करावा म्हणून बाबुरावांनी मि.टॉन्टन ( मुंबई राज्याचे मुख्य शिक्षण सल्लागार ) यांची मुंबईत भेट घेऊन हा मुलीवर अन्याय आहे, त्या शिक्षणापासून वंचित होतील, सहशिक्षण आवश्यक आहे, हे सरकारला पटवून दिल्यामुळे सन १९४५ पासून पुन्हा सरकारने सहशिक्षणास परवानगी दिली [६७].

बाबुराव शिक्षण प्रसाराच्या कार्यात शिक्षणाचा दर्जा, विद्यार्थी, शिक्षकांचे हीत यानाच अधिक महत्व दिल्याचे खालील घटनावरून दिसून येते .

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ( १९४७ ) सरकारने प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी घेतल्याने समितीला आपल्या 'व्हॉलंटरी शाळा' सरकारच्या ताब्यात द्याव्या लागणार होत्या. बाबुराव शिक्षकांचे हीत पाहून त्या देण्यास तयार झाले. तसेच कर्नाटक प्रांतातील सर्व प्राथमिक शाळा सरकारने घेण्याचे जाहीर केले, पण जे शिक्षक खालील अटी पूर्ण करतील

..

अशानाच सरकारी सेवेत सामावून घेतले जाईल असे जाहीर केले [६८].

अ) शिक्षकांनी कमीतकमी पाच वर्षे नोकरी केली पाहिजे.

ब) शिक्षक प्रशिक्षित असला पाहिजे.

क) शिक्षकाचे शिक्षण कमीत कमी मॅट्रीक पास असले पाहिजे.

पण या अटी शिक्षकावर अन्याय करणाऱ्या आहेत असे बाबुराव ठाकूर याना वाटत होते. कारण आतापर्यंत ज्यानी कमी पगारावर, नि:स्वार्थपणे सेवा केली, ग्रामोध्दाराचे कार्य केले त्याना या अटीमुळे घरी बसावे लागणार होते. तेंव्हा " शिक्षकासह शाळा, अन्यथा केवळ शाळेचे विलीनीकरण नाही " अशी रास्त व आग्रही भूमिका कर्नाटकचे शिक्षणमंत्री मा.एस.आर.कंठी यांच्यापुढे मांडून ती मान्य करून घेतली [६९] व शिक्षकासह शाळा सरकारच्या ताब्यात दिल्या.

बाबुराव ठाकूर यांच्या निग्रही भूमिकेमुळे बेळगांव, कोल्हापूर जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांचा फायदा झाला. त्यांच्या या कार्यामुळे कानडी व मराठी शिक्षकांनी सभा घेऊन त्यांचे अभिनंदन व सत्कार केला होता. या घटनावरून त्यांच्या मनात शिक्षकाविषयी जिव्हाळा होता हे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण प्रसार, साक्षरता प्रसार या राष्ट्रीय कार्यासाठी बेळगांव परिसरात भगीरथ प्रयत्न करणाऱ्या बाबुरावाना जनतेने अपरंपार प्रेम केले व वेळोवेळी त्यांच्या मौलिक कार्याची आपल्यापरिने दखल घेतली [७०]. बाबुराव ठाकूर यानी चदगड सारख्या मागासलेल्या भागात शिक्षण प्रसार, प्रौढ शिक्षण, ग्रामोध्दार व सामाजिक कार्य करून जनतेस विकासाचा मार्ग दाविला होता. त्या उपकाराची थोडी परतफेड करण्यासाठी बाबुरावांचा विरोध असतानाही चंदगड

..

तालुक्यातील नागरिकांनी नागनवाडी येथे दिनांक ५-२-१९५४ रोजी व खानापूर तालुक्यातील नागरिकांनी खानापूर येथे दिनांक २०-२-१९५४ रोजी व दिनांक २६-६-१९५४ च्या कन्नड शिक्षकांच्या संम्मेलनात मुगूटखान येथे शिक्षकांनी बाबुराव ठाकूर यांचा उत्स्फूर्त सत्कार केला [७१].

बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समितीने ज्यानी संस्थेला सेवा, कला, त्याग, उद्योग व राष्ट्रीयतेचा गुरुमंत्र दिला; त्या संस्थापक बाबुराव ठाकूर व ज्यांनी ही संस्था जोपासली, वाढविली त्या चतुरदास शहा यांचे बेळगाव येथील समितीच्या इंग्लीश स्कूलच्या इमारतीस " बाबुराव ठाकूर-चतुरदास शहा विद्याभवन " व संस्थेचे पहिले अध्यक्ष डॉ. गो.वा.हेर्लेकर यांचे नाव सभागृहास देऊन [७१] संस्थेने बेळगाव परिसरात शिक्षण प्रसारासाठी भगीरथ प्रयत्न करणाऱ्यांचा गौरव केला.

बाबुरावानी विविध कार्य केल्यामुळे अनेक सामाजिक, राजकीय, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संस्थेस भेटी देऊन किंवा पत्राव्दारे त्यांचा गौरव केला आहे. त्यांचे हे कार्य बेळगाववासीयाना निश्चितच भूषणावह आहे.

खालील मान्यवरांनी संस्थेस भेट देऊन बाबुराव ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला आहे [७२].

१) मा.बाळासाहेब खेर, मुख्यमंत्री, मुंबई राज्य.
२) मा.मुरारजी देसाई, महसूल मंत्री, मुंबई राज्य.
३) मा.सी.डी.देशमुख, अर्थमंत्री, भारत सरकार
४) मा.बॅ.नाथ पै, संसद सदस्य.
५) मा.ना.ग.गोरे, समाजवादी नेता.

..

६) मा.इ.डब्ल्यू. पेरी, विभागीय कमिशनर, बेळगाव.

७) श्री.जे.एम.मदान, विभागीय कमिशनर, बेळगाव.

८) श्री. लाडसाहेब, जिल्हा न्यायाधीश, बेळगाव

९) मा.दयानंद बांदोडकर, मुख्यमंत्री, गोवा.

१०) मा.अ.रं.अंतुले, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

इत्यादि विविध क्षेत्रातील मान्यवरानी संस्थेस भेटी दिल्या.

बाबुराव ठाकूर यानी बेळगाव परिसरात शिक्षण प्रसार व प्रौढ शिक्षण प्रसाराचे जे कार्य केले आहे, त्यास तोड नाही. कारण त्यानी स्वातंत्र्य पूर्व काळात समाज अडाणी राहू नये, त्यास आधुनिकतेची चाहूल लागावी या हेतूने प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंतची सोय उपलब्ध करून दिली. खेड्यातील जनतेस देशी-विदेशी घडामोडी समजू लागल्यामुळे तो राजकीय प्रवाहात सहभागी झाला. शिक्षण ही ठराविक लोकांची मक्तेदारी होती, ती नाहीशी करून त्यानी शिक्षण लमाण तांडा, अस्पृश्यांची वस्ती पर्यंत नेऊन सोडण्याचा प्रामाणिक पण व्यापक प्रयत्न त्यानी केला. तो निश्चितच भावी पिढीला प्रेरणादायी ठरेल.

-000-

## संदर्भ सूची


१) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान २०.

२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२९-१०-३७, पान ५;
श्री.शानभाग,आर.डी., प्रकाशक, मानाचा मुजरा, बेळगाव
जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती, सवर्ण महोत्सवी स्मरणिका,
१९३७-८८, ता.८-१-८९, पान ६.

३) शानभाग,आर.डी. उपरोक्त, पान ६;
तेंडोलकर,र.के., ,बाबुराव ठाकूर यांची कामगिरी, स्मृतिगंध,
बेळगाव, जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती स्मरणिका
ता.२०-१-१९८२, पान २१.

४) मासिक, तरूण भारत, बेळगाव, जुलै १९१९, पान २१.

५) कित्ता:

६) कित्ता: पान २०;
मासिक, तरूण भारत, बेळगाव, नोव्हेंबर १९२२, पान २०.

७) कित्ता: जुलै १९१९, पान २२.

८) कित्ता: पान २३.

९) कित्ता:
जून १९२२, पान २६,
नोव्हेंबर,१९२२, पान २२.

१०) मासिक, तरूण भारत,बेळगाव, जुलै १९१९, पान २३-२४;
जून १९२२, पान २६;
नोव्हेंबर १९२२, पान २२.

११) कित्ता: जुलै १९१९, पान २३.

१२) कित्ता: मार्च-एप्रिल,१९२०, पान ३०८.

१३) कित्ता: जुलै,१९१९, पान २३.

१४) कित्ता: ऑगष्ट,१९१९, पान ३८;
राजाध्यक्ष,ग.गो., बेळगाव जिल्ह्यातील ज्ञानगंगेचे उगमस्थान,
दै.तरुण भारत, बेळगाव, ता.२५-१०-१९८८, पान २.

१५) मासिक, तरुण भारत, बेळगाव, नोव्हेंबर १९२२, पान २३.

१६) कित्ता: मार्च-एप्रिल,१९२०, पान ३०८.

१७) कित्ता: जून,१९२२, पान ३.

१८) कित्ता: सप्टेंबर,१९२३, पान १.

१९) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२६-१०-१९३७, पान ४;
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ४०.

२०) संठणकर,बा.रं., स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकूर तृतीय स्मृतिदिन
विशेषांक, ता.२३-४-१९८२, पान ३;
कामत,हरिभाऊ, स्मृतिगंध, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण
समिती स्मरणिका, ता.२०-२-१९८२, पान २.

२१) साप्ताहिक, तरुण भारत,बेळगाव, ता.२६-१०-३७, पान ६;
शानबाग,आर.डी.,उपरोक्त, पान २.

२२) साप्ताहिक,तरुण भारत, बेळगाव, ता.२६-१०-१९३७,पान ५.

२३) कित्ता:
गुंजीकर,बी.आर., अशी आमची बेळगाव जिल्हा शिक्षण समिती,
स्मृतिगंध, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती स्मरणिका,
ता.२०-२-१९८२, पान ४५;

..

तेंडोलकर र.के., उपरोक्त, पान २१.

२४) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.३-५-१९३८, पान १४; शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ६७.

२५) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१६-६-१९४२, पान ९; कामत,हरिभाऊ, उपरोक्त, पान १.

२६) दिघे,पी.डी., शिक्षण महर्षी डॉ.भाऊराव पाटील, पवार, वसंत, संपादक, साप्ताहिक, अमर हुतात्मा, वाळवा, ता.१४-१-१९९०, पान ४.

२७) कामत,हरिभाऊ, उपरोक्त, पान १.

२८) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१५-२-१९३८, पान ९.

२९) किता:.
शानभाग,आर.डी., उपरोक्त, पान १०९-११०,
अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२-१२-१९५०, पान २.

३०) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२-११-१९३७, पान २.

३१) किता: ता.९-११-१९३७, पान ९.

३२) किता:

३३) किता: ता.२६-१०-१९३७, पान ५.

३४) किता: ता.९-११-१९३७, पान ९;
शानभाग,आर.डी., उपरोक्त,पान ३५.

३५) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२-११-१९३७, पान ९;
ता.१८-१-१९३८, पान ६;
ता.८-२-१९३८, पान ९.

३६) किता: ता.२३-११-१९३७, पान ५,
तां.८-१-१९३८, पान ६,
ता. ८-२-१९३८, पान ६.

३७) किता: ता.१५-१२-१९३७, पान २,
तेंडोलकर, र.के., उपरोक्त, पान २१.

३८) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१८-१-१९३८, पान ४,
शिरगांवकर, भागाण्णा आप्पाजी, शिक्षण समितीची स्थापना, मानाचा मुजरा, बेळगाव जिल्हा प्राथमिक शिक्षण समिती सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, पान १५७.

३९)अ) शानबाग, आर.डी., उपरोक्त, पान ४६.

३९)ब) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.८-२-१९३८, पान १,
ता.१६-६-१९४२, पान ९,
शानबाग, आर.डी., उपरोक्त पान ४९.

४०) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.९-८-१९४२, पान ६.

४१) किता: ता.१६-६-१९४२, पान ९.

४२) स्वातंत्र्यदिन विशेषांक तरूण भारत, बेळगाव, ता.१५-८-१९४७, पान ८,
जुगूळकर, वि.गो. ज्ञानाचा प्रकाश, मानाचा मुजरा, सुवर्ण महोत्सवी स्मरणिका, पान १५५.

४३) शानबाग, आर.डी., उपरोक्त पान १०७-१०८.

४४) किता: पान ८७, १०५, १०७,
कामत हरिभाऊ उपरोक्त, पान ७,
अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.१-२-१९५३, पान ३.

..

४५) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१०-२-१९४२, पान १,
ता.७-६-१९४३, पान ३;
अर्धसाप्ताहिक, ता.२-२-१९५३, पान ३,
ता.४-२-१९५५, पान ३.

४६) डॉ.बेरे ग.श्री., स्वभाव घडविणारी संस्था, स्मृतिगंध, ता.२०-२-८२, पान ३१-३२.

४७) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ५४.

४८) किता: पान ६८;
जुगूळकर, वि.गो., उपरोक्त, पान ५४;
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१६-६-४२, पान ९.

४९) कामत,हरिभाऊ,उपरोक्त, पान २.
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२-६-४२, पान २.

५०) किता: ता.२६-६-४२, पान २,
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ७८.

५१) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ११२.

५२) अर्धसाप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.१-१२-५३,पान ४.

५३) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान १०३-१०४.

५४) किता: पान ११.

५५) तेंडोलकर,र.के., उपरोक्त, पान २३.

५६) सौ.प्रभु, उपरोक्त, पान ५४.

५७) लेले,एम.एच., प्राचार्य व प्रकाशक, आर.पी.कॉलेज, बेळगाव,
वार्षिक अहवाल १९४-४९, मार्च,१९४९, पान ५०-११.

..

५८) तेंडोलकर, र.के., उपरोक्त, पान २३.

५९) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.९-८-१९३८, पान ३;
ता.४-१०-१९३८, पान ११.
ता.४-२-१९४१, पान ५.

६०) किता: ता.२७-१-१९४१, पान २.

६१) किता:

६२) साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.३-५-१९३८, पान १४.
ता.१६-६-१९३८, पान ९,
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ४९.

६३) किता: पान ५४;
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२६-१०-१९३७, पान ५;
ता.८-२-१९४४, पान १; ता.१५-२-१९४४, पान १.

६४) सुंठणाकर,बा.रं., स्मृतिगंध, उपरोक्त, पान ३.

६५) शिरगांवकर,मा.आ., उपरोक्त, पान १५८.

६६) शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ७१-७२,
साप्ताहिक, तरुण भारत, बेळगाव, ता.२६-६-१९४२, पान ५.

६७) पवार,एस.एन., बाबुराव ठाकूर: राजकीय व रचनात्मक कार्य,
स्मृतिसुगंध, बाबुराव ठाकूर तृतीय स्मृतिदिन विशेषांक, पान २६;
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ७२,८४,८८.

६८) किता: पान ८७.

६९) किता:


..

७०) अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२७-६-१९५४, पान २.

७१) कित्ता: ता.११-२-१९५४, पान ३,
ता.२५-२-१९५४, पान २;
ता.२-७-१९५४, पान ४,
कामत,हरिभाऊ उपरोक्त, पान १.

७२) साप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.२५-६-१९४०, पान ३;
ता.१७-१-१९४१, पान ४;
अर्धसाप्ताहिक, तरूण भारत, बेळगाव, ता.३-५-१९५४, पान २;
शानबाग,आर.डी., उपरोक्त, पान ३५,४१,५३, ५५.

-000-